पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक- नस/८/कावि/८३८/२०१४
दिनांक - १६/०४/२०१४

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा
दिनांक- २२/०४/२०१४ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २२/०४/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक- १११

दिनांक- २२.०४.२०१४ वेळ- सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २२/०४/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक-१) मनपाचे स्थानिक संस्था कर विभागाकडील आवश्यक मागणीनुसार मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडुन ३,२०० नग एस्कॉर्ट पावती पुस्तके छपाईकामी र.रु. १,५८,४००/- (अक्षरी र.रू.एक लाख अठ्ठावन्न हजार चारशे) चे खर्चास मान्यता मिळणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-२) मनपाचे क्रीडा विभागाकडील आवश्यक मागणीनुसार मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडुन ५,००० नग प्रवेश तिकीटे छपाई कामी र.रु.१,०५,०००/- (अक्षरी र.रू. एक लाख पाच हजार) चे खर्चास मान्यता मिळणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२१/२०१३-१४ मधील अ.क्र.४ अन्वये, मुंबई पुणे रस्ता पिंपरी चौक ते भक्ती शक्ती चौक निगडी कर्बस्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ.देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.श्री.गणेश कन्स्ट्रक्शन (लक्ष्मण फेरूमल चौधरी) (नि.र.रु.४१,३४,४२५/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख चौतीस हजार चारशे पंचीवस) पेक्षा ३८.३८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. २६,७५,०१४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-४) डॉ.गाडेकर योगेश अ., वैद्यकीय अधिकारी, वाय.सी.एम.एच रुग्णालय यांना PGM-CET 2014 पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पाठविणेबाबत मान्यता देणेसाठी, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील प्रकरण ५ नियम ६३ नुसार सदर अभ्यासक्रमाकरीता ०२ वर्ष असाधारण रजा व प्रकरण ३ नियम.१६ मधील अखंडीत रजेतील ०१ वर्ष अशी एकूण ०३ वर्षाची रजा कोणत्याही प्रकारचे अर्थिक फायदे (मासिक वेतन, भत्ते, रजा वेतन इ.) न देता सेवा अखंडीत ठेवून मंजूर करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८३८/२०१४
दिनांक - १६/०४/२०१४

टिप- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.